स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

मानव्य विद्याशाखेअंतर्गत 'इतिहास' विषयातील पीएच.डी. पदवीसाठी

सादर करण्यात आलेला शोधप्रबंधाचा आराखडा

'मध्ययुगीन ते अर्वाचीन उदगीर: एक ऐतिहासिक अभ्यास'

संशोधक

कांबळे राहुल पंढरी

मु.पो.वळसंगी ता.अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ.चंदन मारूतीराव बावलगावे

संशोधन मार्गदर्शक व इतिहास विभागप्रमुख

संजीवनी महाविद्यालय, चापोली ता.चाकूर जि.लातूर

संशोधन केंद्र

हुतात्मा गोविंद पानसरे महाविद्यालय, अर्जापूर ता.बिलोली जि.नांदेड

नोव्हेंबर २०१९

‘मध्ययुगीन ते अर्वाचीन उदगीर: एक ऐतिहासिक अभ्यास’

प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यातील, मराठवाडा विभागातील लातूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असणारे उदगीर हे शहर महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगणा या तीन राज्यांच्या सीमेवर वसलेले प्राचीन शहर आहे. आज हे शहर मराठवाड्यातील व्यापारी पेठ म्हणून ओळखले जाते. लातूर जिल्ह्यातील लातूर नंतरचे मोठे शहर उदगीर असून वाहतुकीच्या दृष्टीने महाराष्ट्राशेजारील कर्नाटक व तेलंगणा राज्यातील प्रमुख शहराशी रेल्वे व रस्ते मार्गानी जोडलेले आहे.

उदगीरच्या इतिहासाची सुरुवात राष्ट्रकुट घराण्याच्या कालखंडापासून सुरू होते. राष्ट्रकुट राजा अमोघवर्ष याच्या कारकिर्दीत जैन धर्माचे उदगीर हे मोठे पीठ होते. कल्याण चालुक्य काळात राजधानी कल्याण (आधुनिक बसवकल्याण जि.बिदर, कर्नाटक) जवळील एक प्रमुख शहर म्हणून उदगीरचा व येथील किल्ल्याचा विस्तार घडून आला. याच काळात उदगीर व परिसरात शिल्प व स्थापत्याची निर्मिती झाली. उदगीर परिसरातील साधारणतः ५० ते ६० कि.मी. परिसरात अनेक चालुक्यकालीन स्थापत्य व शिल्प पहावयास मिळतात. देवगिरीच्या यादव काळातील अंबाजोगाई, कान्हेरगाव येथील शिलालेखाच्या माध्यमातून उदगीरच्या इतिहासावर प्रकाश पडतो. उदगीरपासून जवळ असणाऱ्या अंबाजोगाई या ठिकाणी कायमस्वरूपी यादवाची लष्करी छावणी तैनात होती. यादव काळात भरभराटीस आलेली हेमाडपंथीय शैलीची अनेक मंदिरे उदगीर परिसरात निर्माण झाली. यादव काळातच उदगीरचा सांस्कृतिक इतिहास भरभराटीस आला. अल्लाउद्दीन खिलजीच्या माध्यमातून दक्षिण भारतावर मुस्लिम राजसत्तेची सुरूवात झाली. यातच हिंदुचे राज्य लयास गेले. पर्यायाने उदगीर व परिसरावर इस्लामिक सत्ता निर्माण झाली. या अगोदर वरंगळच्या काकतीयांची उदगीर व परिसरावर काही काळ सत्ता असल्याचे पुरावे कोरीव लेखाच्या माध्यमातून उपलब्ध होता. इस्लामीक सत्ताधिशांप्रमाणे बहामणी, अहमदनगरची निजामशाही, विजापुरची आदिलशाही,

बीदरच्या बरीदशाहीचा राजकीय प्रभाव उदगीर व परिसरावर होता. पुढे १६ व्या व १७ व्या शतकात मोगलांचा प्रभाव मराठवाड्यावर वाढून उदगीर परिसर मोगलांच्या ताब्यात गेला. उदगीरच्या किल्ल्यातील व परिसरातील शिलालेखाच्या द्वारे या कालखंडातील उदगीरच्या इतिहासावर प्रकाश पडतो.

१७ व्या व १८ व्या शतकात महाराष्ट्रात मराठी सत्तेचा उदय व विकास होत असताना निजाम-उल-मुल्कने हैद्राबाद येथे स्वतंत्र अशा निजामी सत्तेची स्थापना (इ.स.१७२४) केली. आधुनिक महाराष्ट्रातील मराठवाडा निजामाच्या वर्चस्वाखाली आला. १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत निजामाचे वर्चस्व उदगीर व परिसरावर होते. हे वर्चस्व झुगारून लावण्यासाठी लोकआंदोलने झाली. आर्य समाज, किसान दल, हैद्राबाद स्टेट काँग्रेस अशा संघटनांनी यासाठी प्रयत्न केले. उदगीर त्यावेळेचे आर्य समाजाचे प्रमुख केंद्र होते. येथे आप्पाराव पाटलांनी किसान दलाच्या माध्यमातून सशस्त्र आंदोलन उभारले. उदगीर हे शहर तीन राज्यांच्या सीमेवर असल्यामुळे सांस्कृतिक विविधता, एकता येथे पहावयास मिळते. हिंदू व जैन स्थापत्यासोबत इस्लामिक स्थापत्य व कला उदगीर परिसरात पहावयास मिळते. शहरात सुफीचे पाच दर्गे आहेत. 'बाग-ए-निर्माण झाली.

विषयाची निवड

ऐतिहासिक दृष्टिकोनातून उदगीर शहर व परिसर अत्यंत महत्त्वाचा असून १७२४ ते १९४८ कालखंडात अनेक ऐतिहासिक घटना घडलेल्या आहेत. त्यात इ.स.१७६० ची लढाई जी मराठे आणि निजाम यांच्यातील होती ती अत्यंत महत्त्वाची आहे. मराठवाडा स्वातंत्र्य संग्राम असे असतानाही उदगीर व परिसरावर महत्त्वपूर्ण असे ऐतिहासिक संशोधन झालेले नाही. प्राथमिक दर्जाची साधने मुबलक प्रमाणात असतानाही प्रस्तुत विषय दुर्लक्षित आहे. आधुनिक काळात स्थानिक इतिहासाला महत्त्व आलेले असल्यामुळे ऐतिहासिक समस्या म्हणून **'मध्ययुगीन ते अर्वाचीन उदगीर: एक ऐतिहासिक अभ्यास'** हा विषय निवडलेला आहे.

संशोधन घटकाच्या निवडीमागील हेतू व उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनाच्या निवडीमागील काही हेतू व उद्दिष्टांची खालीलप्रमाणे पुर्तता करण्याचा प्रयत्न केला जाईल.

१) उदगीर परिसराच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक जीवनावर प्रकाश टाकणे.

२) उदगीर परिसराच्या इतिहासावर प्रकाश टाकणे.

३) मंदिर स्थापत्य अवशेषांच्या आधारे मंदिर स्थापत्याचा अभ्यास करणे.

४) हिंदू व जैन मूर्तिशिल्पांचा शोध घेवून त्यावर प्रकाश टाकणे.

५) मध्ययुगीन स्थापत्याचा शोध घेवून त्यावर प्रकाश टाकणे.

६) उदगीर व परिसरातील सूफी पंथासोबतच येथील दर्ग्याचा अभ्यास करणे.

७) उदगीर परिसरातील उत्सव व परंपरा याचा वारसा अभ्यासणे.

८) राजकीय, सामाजिक व धार्मिक चळवळीतील उदगीर परिसराचे योगदान अभ्यासणे.

९) उदगीर परिसरातील महाल, वाडे, गढी यांच्या स्थापत्यशैलीचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके

१) उदगीर व परिसराला पुरातन इतिहास लाभलेला आहे.

२) उदगीर व परिसराला पुरातत्त्वीय दृष्टीने महत्त्व आहे.

३) उदगीर व परिसरात बहुतांश हिंदू व जैन मंदिर स्थापत्य आढळतात.

४) उदगीर परिसरात हिंदू व जैन मूर्तिशिल्पे आहेत.

५) उदगीरच्या धार्मिक एकोप्यात सुफी संतांचे योगदान मोलाचे आहे.

६) उदगीर व परिसरात कोरीव लेख आढळतात.

७) उदगीर परिसरातील विविध परंपरामुळे सामाजिक आणि धार्मिक चळवळीचा विकास झाला आहे.

८) विविध राजकीय घराण्याचा अमल या परिसरावर होता.

९) हैद्राबाद मुक्तिसंग्रामात उदगीर व परिसराचे खूप मोठे योगदान आहे.

१०) उदगीर परिसरातील लोक सण व उत्सवप्रिय आहेत.

११) उदगीर परिसरावर सरंजामशाहीचा प्रभाव दिसून येतो.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन कार्य हे ऐतिहासिक मध्ययुगीन ते अर्वाचीन या कालखंडाशी संबंधीत असल्यामुळे त्या कालखंडाशी पूरक अशा जास्तीत जास्त प्राथमिक साधनांचा उपयोग केला जाईल. संबंधित विषयाच्या अनुषंगाने प्राथमिक साधनांमध्ये तत्कालीन कोरीव लेख, तत्कालीन वाङ्मय, पुरातत्त्वीय अवशेष याशिवाय सर्वेक्षण, प्रश्नावली, मुलाखती आणि आत्मचरित्रे इत्यादींचा उपयोग साधन म्हणून केला जाईल. याशिवाय प्रकाशित व अप्रकाशित साधनांचा उपयोग केला जाईल.

संशोधन विषयाचे महत्त्व

स्थानिक इतिहासाच्या दृष्टीने उदगीर व परिसराचा इतिहास दुर्लक्षित राहिलेला दिसतो. मध्ययुगीन ते अर्वाचीन काळात उदगीर व परिसरात अनेक ऐतिहासिक घटना घडलेल्या आहेत. असे असताना काही मोजक्याच घटना उजेडात आलेल्या आहेत. या संशोधनाच्या माध्यमातून इतिहासात गडप झालेल्या विविध घटना, त्यांचा समाज जीवनावर झालेला परिणाम, दुर्लक्षीत ऐतिहासिक घटक या सर्वांचा ऐतिहासिक शास्त्रीय पद्धतीने संशोधनाच्या माध्यमातून उदगीर परिसराचा इतिहास प्रकाशात आणण्याचा प्रयत्न केला जाईल.

अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा

प्रस्तुत संशोधन मध्ययुगीन ते अर्वाचीन या कालखंडाशी संबंधित आहे. या कालखंडात उदगीर परिसरात घडलेल्या ऐतिहासिक प्रमुख घटनांवर संशोधनाच्या माध्यमातून प्रकाश टाकला जाईल. प्रस्तुत संशोधन समस्येत राजकीय इतिहासासोबतच धार्मिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक इतिहासाचा ऊहापोह केला जाईल. प्रस्तुत संशोधन कार्य करत असताना काही मर्यादा येऊ शकतात, याची जाणीव ठेवून संशोधन कार्य केले जाईल. यासाठी

अधिकाधिक प्राथमिक साधने अभ्यासली जातील. मात्र या साधनांची जेव्हा मर्यादा असेल अशा वेळी दोन घटकांना जोडण्यासाठी दुय्यम साधनांचा वापर केला जाईल. मध्ययुगीन इतिहासाचा अभ्यास करताना उदगीर व उदगीरपासून ५० ते ६० कि.मी. परिसरातील ऐतिहासिक स्थळाचा व घडामोडींचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरेल.

प्रकरण मांडणी

प्रस्तुत संशोधन प्रबंधाचे शीर्षक **'मध्ययुगीन ते अर्वाचीन उदगीरः एक ऐतिहासिक अभ्यास'** असे असून त्याची विभागणी पुढील सहा प्रकरणांमध्ये केली जाईल.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

शोधप्रबंधातील पहिले प्रकरण प्रस्तावना हे आहे. या प्रकरणात संशोधन विषयाची प्रस्तावना, संशोधन विषय निवडीचा उद्देश, संशोधनाची उद्दिष्टे, गृहितके, आवश्यकता, संशोधनाची व्याख्या व मर्यादा, संशोधन पद्धती, संदर्भ साहित्य, पूर्व संशोधनाचा आढावा आणि संशोधन विषयाचे महत्त्व इत्यादीचा सविस्तर आढावा घेण्यात येईल.

प्रकरण दुसरे : उदगीर परिसराचा राजकीय इतिहास

प्रस्तुत दुसऱ्या प्रकरणात उदगीर परिसराचा राजकीय इतिहास स्पष्ट केला जाईल. उदगीरचा इतिहास हा मध्ययुगीन कालखंडाशी संबंधित अत्यंत महत्त्वपूर्ण असून त्याचा राजकीय इतिहास थोडक्यात मांडला जाईल. यामध्ये राष्ट्रकुट कल्याणीचे चालूक्य खिलजी वंशापासून ते हैद्राबादच्या निजाम राजवटीपर्यंतचा इतिहास अभ्यासला जाईल. यामध्ये खिलजी (इ.स.१२९४-इ.स.१३२०), तुघलक (इ.स.१३२० ते इ.स.१३५०), बहामणी (इ.स.१३५० ते इ.स.१५२६), बरीदशाही (इ.स.१४९२ ते इ.स.१५४७), अहमदनगरची निजामशाही (इ.स. १५४७ ते १६३६), मोगल (इ.स.१६३६ ते इ.स.१७०७), निजाम कालखंड पहिला (इ.स.१७०७ ते इ.स.१७६०), मराठे (इ.स.१६६० ते इ.स.१७६०), निजाम कालखंड दुसरा (इ.स.१७६२ ते इ.स.१९४८) यांचा समावेश प्रामुख्याने होता. या विविध राजवटीचा अभ्यास करताना त्यांच्यातील सहसंबंधाचाही अभ्यास केला जाईल.

प्रकरण तिसरे : उदगीर परिसरातील सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक परिस्थिती

प्रस्तुत प्रकरणातून उदगीरच्या सामाजिक, धार्मिक, आर्थिक स्थितीचा आढावा घेण्यात येईल. यातूनच आपणाला गतवैभवाची माहिती मिळते. समाजात अनेक जाती व उपजातीत विभागणी केलेली होती. हिंदू समाजामध्ये अनेक पंथ, जाती व उपजाती होत्या. मुस्लिम धर्मावरही याचा प्रभाव पडून मुस्लिम कासार, तांबोळी, बागवान इत्यादी जाती निर्माण झालेल्या पहावयास मिळतात. जातीचा उदय, कुटुंब पद्धती, विवाहाच्या पद्धती, आहार, केशभूषा, वेशभूषा, राहणीमान, मनोरंजनाची साधने इ. घटक तर धार्मिकमध्ये वैष्णव पंथ, शैव पंथ, जैन धर्म, वीरशैव लिंगायत इ. इस्लाम धर्मामध्ये सुफी संप्रदाय अशा धार्मिक घटकांचा अभ्यास संबंधित उपघटकामध्ये केला जाईल. आर्थिक घटकांमध्ये-शेती, पाण्याची सुविधा, पिके, व्यवसाय व उद्योग, मूर्तीकाम, नाणी टाकसाळ, व्यापार या आर्थिक घटकांचा अभ्यास संबंधित प्रकरणात केला जाईल.

प्रकरण चौथे : उदगीर परिसरातील सामाजिक व धार्मिक चळवळी

उदगीर शहर अत्यंत संवेदनशील शहर म्हणून ओळखले जाते. पुरोगामी विचाराची अनेक मंडळी येथे होऊन गेली. ज्यांनी सामाजिक आणि धार्मिक चळवळीला गती देण्याचा प्रयत्न केला. जैन, लिंगायत, सुफी, वारकरी, महानुभाव, नाथ संप्रदाय या धर्मातील अनेक मंडळींनी आपापल्या परीने धार्मिक चळवळी व समाज सुधारणा घडवून आणण्याचा प्रयत्न केला. या संबंधीचा अभ्यास संबंधित चौथ्या प्रकरणात सविस्तरपणे केला जाईल.

प्रकरण पाचवे : उदगीर परिसरातील कला व स्थापत्य

प्रस्तुत प्रकरणात मध्ययुगीन कालखंडातील हिंदू, जैन व मुस्लिम धर्मांशी संबंधित स्थापत्य कलेचा अभ्यास केला जाईल. याशिवाय उदगीर परिसरातील हिंदू, जैन धर्मातील विविध पंथ-उपपंथाशी संबंधित मूर्ती व शिल्पांचा अभ्यास केला जाईल. सार्वजनिक वापरातील इमारती, बगीचे, किल्ला, मध्ययुगीन कालखंडातील प्रशासकीय इमारती, गढी वाडे, सराया इ. स्थापत्यांचा ही संबंधित संशोधन घटकात अभ्यास केला जाईल.

प्रकरण सहावे : निष्कर्ष

प्रस्तुत शोधप्रबंधातील शेवटचे प्रकरण निष्कर्षाचे असेल. यात वरील पाच प्रकरणांचा आढावा घेऊन विविध साधनाचे चिकित्सक पद्धतीने विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात येतील शेवटी संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ठ्ये जोडण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची

१) राजाराम थावरा राठोड, उदगीरचा इतिहास आणि स्मारके, प्रथम आवृत्ती, प्रकाशक डॉ.ना.य. डोळे, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर, १९६८

२) शिवाजी माधवराव सगर, उदगीरचा राजकीय व सांस्कृतिक इतिहास, प्रथम आवृत्ती, शिल्पा प्रकाशन, उदगीर, १७ सप्टें. २०११

३) गणेश काशिनाथ होनराव, पूर्व मध्ययुगीन शैव धर्म संप्रदाय, प्रथम आवृत्ती, अरूणा प्रकाशन, लातूर, २०१५

४) सु.ग. जोशी (संपा.), लातूर जिल्ह्याचा इतिहास, संस्कृती व कोरीव लेख (अप्रकाशित)

५) यु.म. पठाण, मराठवाड्यातील मराठी शिलालेख, औरंगाबाद, १९८९

७) लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

८) भारतीय जनगणना अहवाल २००१ व २०११

९) मुजुमदार आर.सी. (संपा.), दिल्ली सल्तनत, भारतीय विद्याभवन, मुंबई, १९६७

१०) सेतु माधवराव पगडी, महाराष्ट्र आणि मराठे, जोशी-लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६३

१३) ग.ह. खरे (संपा.), दक्षिणेकडील मध्ययुगीन इतिहासाची साधने, भाग-१, पुणे इतिहास संशोधन मंडळ, १९६४

संशोधक

कांबळे राहुल पंढरी

मु.पो.वळसंगी ता.अहमदपूर जि.लातूर

मार्गदर्शक

प्रा.डॉ.चंदन मारुतीराव बावलगावे

संशोधन मार्गदर्शक व इतिहास विभागप्रमुख

संजीवनी महाविद्यालय, चापोली ता.चाकूर

जि.लातूर